# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक:22.06.2025** **वार:रविवार**

---

•जागतिक अशांतता, अस्थिरतेच्या काळात योग शांततेच्या मार्गाची वाट दाखवत असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

•देशासह राज्यात११ वा जागतिक योग दिन विविध उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा

•संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या पालखीचं सासवडच्या दिशेनं प्रस्थान

आणि

•मुख्यमंत्री चषक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेचं नागपुरात उद्घाटन

**<u>पंप्रविशाखापट्टणम्</u>**

जागतिक पातळीवर विविध देशांमधील वाढता तणाव, अशांतता आणि अस्थिरतेचे वातावरण असताना, योग हा शांततेच्या मार्गाची वाट दाखवत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. अकराव्या जागतिक योग दिनानिमित्त विशाखापट्टणम् इथं आयोजित समारोहाचे नेतृत्व करत त्यांनी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. पंतप्रधानांनी जागतिक समुदायाला, मानवतेसाठी योग अभ्यासाच्या दुसऱ्या टप्प्याची सुरूवात म्हणून साजरा करण्याचं आवाहन केलं,जेणेकरून अंतर्गत शांतता हे जगाचे धोरण होईल. योग हा वैयक्तिक सरावाचा भाग राहिला नसून तो जागतिक सहभागाचे माध्यम म्हणून उदयाला आला आहे असं सांगून ते म्हणाले....

**<u>मोदी बाईट</u>**

***योग से हमें शांति की दिशा मिलती है. मैं विश्व समुदाय से आज के इस महत्वपूर्ण अवसर पर एक आग्रह करूंगा. लेट दिस योगा डे मार्क द बिगनिंग ऑफ योगा फॉर ह्यूमानिटी ट्र प्वाइंट ओ, वेन इनर पीस बिगेन ग्लोबल पॉलिसी.***

आधुनिक संशोधनाच्या माध्यमातून योग विज्ञानाला जागतिक स्तरावर बळ मिळण्यासाठी देशाचे प्रयत्न अधोरेखित केले. देशातल्या प्रमुख वैद्यकीय संस्था योग संशोधनामध्ये सक्रीय असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. याचा उद्देश समकालीन निदान उपचारांमध्ये योगची समर्पकता प्रस्थापित करणं असा असल्याचं सांगून पंतप्रधान म्हणाले...

***<u>मोदी बाईट</u>***

***योग की वैज्ञानिकता को आधुनिक चिकित्सा पद्धति में स्थान मिले, ये हमारा प्रयास है। हम देश के मेडिकल और रिसर्च इंस्टीट्यूशन्स में, योगा के क्षेत्र में एविडेंस बेस्ड थेरेपी को भी प्रोत्साहित कर रहे हैं. इस दिशा में दिल्ली के एम्स की रिसर्च में सामने आया है कि योग की कॉर्डियक और न्यूरोलॉजी डिस्ऑर्डर्स के उपचार और वूमन हेल्थ और मेंटल वेल-बींग में अहम भूमिका है.***

या वर्षाच्या योगदिनाची संकल्पना “एक पृथ्वी एक आरोग्य” अशी होती, योगाभ्यास वर्तमान आणि भावी पिढ्यांचे सुखद भविष्य सुनिश्चित करण्यासाठी संपूर्ण जग एकत्रित आल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. विशाखापट्टणम इथल्या मुख्य कार्यक्रमात २ लाख ७२ हजार लोकांनी सहभाग घेतला.

**<u>देवेंद्रफडणवीस</u>**

भक्ती आणि योग यांच्या माध्यमातून आरोग्यदायी समाजाची निर्मिती व्हावी यासाठी सर्वांनी  मिळून प्रयत्न करण्याचं आवाहन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. जागतिक योग दिनाच्या निमित्तानं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी आणि श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू यांच्याद्वारे आयोजित ‘वारकरी भक्तीयोग’ कार्यक्रमात ते काल बोलत होते. संयुक्त राष्ट्राच्या इतिहासात सर्व देशांनी पाठिंबा दिलेला योगदिनाचा एकमात्र प्रस्ताव असल्याचं सांगून मुख्यमंत्री यावेळी म्हणाले-

**<u>राज्यपालयोगदिन</u>**

अकराव्या योग दिनानिमित्त राज्यात सरकारी संस्था, संघटना तसंच सामान्य नागरिकांच्या सहभागासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्ण यांनी राजभवनामध्ये झालेल्या योग दिन सोहळ्यात सहभाग घेतला. सर्व विद्यापीठांमध्ये योग अभ्यास सुरू करण्याबाबत कुलगुरूंशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**<u>योगराज्य</u>**

योगदिनानिमित्त राज्यात बहुतांश जिल्ह्यांमध्ये विविध कार्यक्रमांचं तसंच योगसराव सत्रांचं आयोजन करण्यात आलं होतं. सर्व जिल्ह्यांचे पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी तसंच पोलीस अधीक्षक देखील या सरावांमध्ये सहभागी झाले होते. युनेस्कोच्या वारसा स्थळ यादीत समाविष्ट असलेल्या राज्य वारसा स्थळांवरही योग प्रात्यक्षिकं सादर झाली. मुंबईजवळच्या कान्हेरी लेणी, घारापुरी लेणी, बुलडाण्यातील गायमुख मंदीर, पुण्यातलं आगाखान पॅलेस, शिवनेरी किल्ला, छत्रपती संभाजीनगरमध्ये बिबी का मकबरा, अजिंठा लेण्या, अमरावतीमध्ये बौद्धस्तूप इथं योग प्रात्यक्षिक झालं.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल कान्हेरी लेणी, दहीसर आणि कांदिवली इथं तर भुसावळ इथं केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी योग दिन कार्यक्रमात सहभाग घेतला. पुण्यातल्या योग सत्रात नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सहभाग घेतला.तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी मुंबईत योग बाय द बे उपक्रमात सहभाग घेतला. अली यावर जंग राष्ट्रीय वाचा आणि श्रवण विकलांग संस्थेद्वारे “योग दिव्यांगासाठी निरोगी जीवन” या सत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. अंध जन मंडळ मुंबई आणि एफआरएसटी (FRST) फाउंडेशन यांच्याद्वारे आयोजित कार्यक्रमात योगसाधक कवटीया आमीन आणि त्यांच्या चमूनं प्रात्यक्षिकं सादर केली. एफआरएसटी (FRST) फाउंडेशनने तयार केलेले अंधांसाठीचे अनुकूल रेनकोट यावेळी शंभरहून अधिक लाभार्थ्यांना वाटण्यात आले.

नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शहरातील यशवंत स्टेडियम मैदानावरील मुख्य कार्यक्रमात तर चंद्रपुरात राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी योगभ्यासात सहभाग घेतला.

सांगलीत आयोजित भक्तियोग कार्यक्रमामध्ये पाच लाखांहून अधिक नागरिक सहभागी झाले होते. बीडमध्ये “योग दिंडी आपल्या दारी” या अभियानाची सुरूवात झाली. सोलापुरात केंद्रीय संचार ब्युरो,तसंच जिल्हा आणि पोलिस प्रशासनानं संयुक्तपणे योग दिन कार्यक्रमाचे आयोजन केलं. धाराशिवमध्ये जिल्हा प्रशासन आणि विविध संस्थांनी योग दिन साजरा केला. धुळ्यात पोलिस मैदानावर योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली योगसराव करण्यात आला. तर अकोल्यात डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसरात झालेल्या कार्यक्रमात नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले.

बुलडाण्यात जिल्हा कारागृह आणि जिल्हा विधीसेवा प्राधिकरण यांच्या सहयोगानं कारागृहात योगदिन साजरा झाला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ल्यातल्या सिंधुसागर जलतरण तलावात विद्यार्थ्यांनी जलतरण करत विविध योगप्रकारांचे प्रात्यक्षिक सादर केलं.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या महाराष्ट्र शाखेनं राज्यातल्या सर्व जिल्ह्यात सामूहिक योग सत्रे राबवली. त्याशिवाय आयआयएम मुंबई, गोव्यातील अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान, दक्षिण नौदल मुख्यालय, कोकण रेल्वे, पश्चिम रेल्वे आणि  गोवा शिपयार्ड आदी संस्थांनीही योग दिन उत्साहात साजरा केला.

**<u>इंट्रो :पालखी</u>**

संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराजांच्या पालख्यांचा विसावा काल पुण्यात होता. सर्वत्र चैतन्याचं वातावरण होतं. आमच्या प्रतिनिधीचा हा वृत्तांत...

***स्क्रीप्ट :परवा पुण्यात आगमन झाल्यानंतर काल दिवसभर संत श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात तर तुकाराम महाराजांच्या पालखीचा नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्काम होता. काल याठिकाणी दर्शनासाठी काही किलोमीटर पर्यंतच्या रांगा लागल्या होत्या. दोन्ही मंदिरांच्या बाहेर भव्य मंडप उभारण्यात आला होता.  वारकऱ्यांच्या सेवार्थ राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, गणेश मंडळे आणि रहिवासी संकुलांनी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले होते.  त्यात अन्नदान, चरण सेवा आणि आरोग्य सेवा, वारीदरम्यानच्या आवश्यक वस्तूंचे वाटप तसंच योग दिनानिमित्त विविध उपक्रम देखील राबवण्यात आले, तसेच योग दिनाचा संदेश देणाऱ्या मोठ्या प्रमाणात गांधी टोप्या वारकऱ्यांना वाटण्यात आल्या. पालखी सोहळ्यामुळे पुण्याच्या मध्यवस्तीला काल यात्रेचे स्वरूप आलं होतं.  काही वारकऱ्यांनी कालचा विसाव्याचा दिवस पर्यटनासाठी  दिला होता. त्यात वारकऱ्यांनी सकाळपासून शनिवार वाडा, पर्वती, दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर आणि कसबा गणपती इत्यादी ठिकाणी गर्दी केली होती. काहींनी मेट्रो सफरीचाही आनंद घेतला. शहराच्या मध्यवर्ती भागासोबतच उपनगरात देखील वारीनिमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले होते. याठिकाणी मंदिरे, महानगरपालिकांच्या शाळा, रहिवासी संकुले, मैदाने इत्यादी ठिकाणी वारकऱ्यांच्या मुक्कामाची सोय करण्यात आली होती. आता दोन्ही पालख्या हडपसरमार्गे मार्गस्थ होत असून आज माऊलींची पालखी अवघड असा दिवे घाट पार करून सासवडला तर तुकोबांची पालखी मांजरीमार्गे लोणी-काळभोरच्या मुक्कामी जाईल. आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले पुणे***

**<u>मुख्यमंत्रीचषकउद्घाटन</u>**

कुस्तीपटूंनी राज्याला पुन्हा एकदा ऑलिम्पिक स्पर्धेत अव्वल स्थान मिळवून द्यावं अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं व्यक्त केली. मुख्यमंत्री चषक राष्ट्रीय कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. कुस्तीपटुंना पायाभूत सुविधा, प्रशिक्षणासह आवश्यक मदत करण्यात येईल असं आश्वासन फडणवीस यांनी दिलं.

**<u>क्रिकेट</u>**

लंडनमध्ये लीड्समधील हेडिंग्ले इथं सुरू असलेल्या अँडरसन - तेंडुलकर करंडक पाच सामन्यांच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताच्या पहिल्या डावातील ४७१ धावांना प्रत्युत्तर देताना इग्लंडनं 3 गडी बाद 209 धावा केल्या. भारताच्या पहिल्या डावात यशस्वी जयस्वाल, कर्णधार शुभमन गिल, उपकर्णधार ऋषभ पंत यांनी शतकं झळकावली. तर भारताचे उर्वरित गडी धावांची फार भर टाकू शकले नाहीत.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या  घाट प्रदेशात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तर विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह पाऊस पडेल.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**